**मुख्य कार्यालय, विरार**

**विरार (पुर्व),**

**ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१३०५.**

दुरध्वनी : ०२५०-२५२५१०५/०६/२५२९८८८/२५२९८९०

फॅक्स : ०२५०-२५२५१०७

ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

**जावक क्र. : व.वि.श.म./अति.आ.(द.)/02/21**

**दिनांक : १४/०४/२०२१**

**अत्यंत महत्वाचे / तातडीचे**

# आदेश

**विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामधील Break The Chain चे आदेश.**

**संदर्भ :-**

१. साथ रोग अधिनियम - १८९७ चे कलम ०२.
२. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम-२००५.
३. शासन, महसुल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाकडील आदेश क्र.डीएमयु/२०२०/सीआर.९२/डीआयएसएम-१, दिनांक २७/०३/२०२१.
४. शासन, महसुल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाकडील आदेश क्र. डीएमयु/२०२०/सीआर.९२/डीआयएसएम-१, दिनांक ०४/०४/२०२१.
५. या कार्यालयाचे आदेश क्र.व.वि.श.म./अति.आ.(द.)/०१/२१, दिनांक ०५/०४/२०२१
६. शासन, महसुल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाकडील आदेश क्र. डीएमयु/२०२०/सीआर.९२/डीआयएसएम-१, दिनांक ०५/०४/२०२१.
७. शासन, महसुल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाकडील आदेश क्र. डीएमयु/२०२०/सीआर.९२/डीआयएसएम-१, दिनांक १३/०४/२०२१.

ज्याअर्थी, राज्यात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव वाढत असल्याचे दिसून आले आहे आणि या प्रादुर्भावामुळे कोविड-१९ चा संसर्ग मोठया प्रमाणावर वाढण्याची शक्यता निर्माण झाली असून, जनतेच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. यास्तव कोविड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी व त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून शासनाने यापूर्वी वेळोवेळी निर्बंध लागू केले आहेत

आणि ज्याअर्थी, शासन आदेशास अनुसरुन वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीमध्ये प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत मार्गदर्शक सूचना संदर्भ क्र.५ व यापूर्वी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशान्वये जाहीर करण्यात आल्या आहेत. कोविड-१९ च्या नियंत्रणासाठी आणखी काही निर्बंध लागू करणे आवश्यक असल्याबाबत शासनाची खात्री झाली असून, त्याअनुषंगाने उपरोक्त संदर्भ क्र.७ च्या आदेशानुसार राज्यात यापूर्वी लागू करण्यात आलेल्या निर्बंधांसह आणखी काही निर्बंध लागू करण्यात आले आहेत.

आणि ज्याअर्थी,   वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये देखिल कोविड-१९ चा वाढता प्रादुर्भाव विचारात घेता, कोविडचा संसर्ग रोखण्यासाठी खबरदारीची प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून आणखी काही निर्बंध लागू करण्याची आवश्यकता निर्माण झाली असल्याची **आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका** यांची खात्री झाली आहे.

त्याअर्थी, उपरोक्त **संदर्भ क्र. ७** च्या शासन आदेशास अनुसरुन वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये आयुक्त, **वसई विरार शहर** महानगरपालिका **दि. १ मे, २०२१ पर्यत** खालीलप्रमाणे निर्बंध लागू करण्यात येत असल्याचे जाहीर करीत आहेत.

**१. कलम १४४ व नाईट कर्फ्यु लागू असणे :**

a) **वसई विरार शहर** महानगरपालिका क्षेत्रात कलम १४४ लागू असेल.
b) खाली नमूद केलेल्या कारणा व्यतिरिक्त, कोणीही व्यक्ति सार्वजनिक ठिकाणी  फिरु शकरणार नाही.
c) सर्व आस्थापना, सार्वजनिक ठिकाणे, उपक्रम, सेवा बंद राहतील.
d) जिवनावश्यक श्रेणीत मोडणा-या सेवा, व्यवहार हे यातून वगळण्यात येत आहे.
e) अपवाद श्रेणी असलेल्या सेवा आणि व्यवहार सोमवार ते शुक्रवार सकाळी ७ ते रात्री ८ वाजेपर्यंत वगळण्यात येत आहे.

**२. जिवनावश्यक श्रेणीत खालील बाबींचा समावेश आहे :**

१. रुग्णालये, निदान केंद्रे, लसीकरण, वैद्यकीय विमा कार्यालय, औषध दुकाने, औषध कंपन्या, इतर वैद्यकीय आणि आरोग्य सेवा ज्यात उत्पादन आणि वितरण संबंधित आस्थापना असतील म्हणजे वितरक,वाहतुकदार, पुरवठा साखळीतील व्यक्ति, लसींचे उत्पदान आणि वितरण, सॅनिटाईजर, मास्क, वैद्यकीय उपकरणे, इतर पुरक उत्पादने आणि सेवा.
२. पाळीव प्राण्यांसाठीची खाद्यदुकाने, प्राण्यांसंबंधी सेवा, प्राण्यांचे निवारागृह आदी.
३. किराणा सामानाची दुकाने, भाजीपाला दुकाने, फळविक्रेते, दूध डेअरीज, बेकऱ्या, सर्व प्रकारची खाद्यान्न दुकाने.
४. शीतगृहे आणि वखारसेवाविषयक आस्थापना.
५. सार्वजनिक वाहतूक – हवाई सेवा, रेल्वेसेवा, टँक्सी, रिक्षा आणि सार्वजनिक बस गाड्या.
६. विविध राजनैतिक अधिकाऱ्यांच्या कार्यालयीन आणि अनुषंगिक सेवा.
७. **वसई विरार शहर** महानगरपालिकेच्या क्षेत्रातील मान्सूनपूर्व देखभाल दुरुस्ती कामे.
८. **वसई विरार शहर** महानगरपालिकेच्या क्षेत्रातील सर्व सार्वजनिक कामे.
९. रिझर्व्ह बँक आणि त्यांनी आवश्क ठरवलेली सर्व कामे.
१०. SEBI मान्यताप्राप्त  सर्व कामं ज्यात स्टॉक एक्स्चेंज, डिपॉझिरी, क्लिअरिंग संबंधीत कामे.
११. दूरसंचार सेवांशी संबंधित सेवा, देखभाल दुरुस्ती.
१२. वस्तूंची वाहतूक
१३. पाणीपुरवठा विषयक सर्व कामे, सेवा.
१४. शेतीशी संबंधित सर्व कामे आणि शेती निरंतरपणे होऊ शकेल यासाठीची सर्व कामे. य़ात बी -बियाणे, खते, उपकरणे आणि दुरुस्ती हे सर्व समाविष्ट आहे.
१५. आयात निर्यात विषयक सर्व व्यवहार.
१६. जीवनावश्यक वस्तूविषयक ई-कॉमर्स.
१७. अधिकृत मिडिया.
१८. पेट्रोल पंप आणि पेट्रोलसंबंधी उत्पादने, समुद्रात वा किनारपट्टीवरील उत्पादने.

१९. सर्व प्रकारच्या कार्गो सेवा
२०. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातल्या सर्व प्रकारच्या क्लाऊडसेवा, डेटा सेंटर्स आणि पायाभूत सुविधांसाठीच्या महत्त्वाच्या माहिती-तंत्रज्ञानविषयक सेवा.
२१. सरकारी आणि खासगी सुरक्षारक्षक सेवा.

२/९

२२. विद्युत तसेच गॅसपुरवठा सेवा.
२३. एटीएम आणि तत्संबंधीच्या सेवा
२४.टपालसेवा.
२५. बंदरे आणि त्यासंबंधीतच्या सेवा.
२६. लस तसेच इतर जीवरक्षक औषधे आणि औषधी उत्पादकांचे कस्टम हाऊस एजंट तसेच परवानाधारक मल्टिमोडल वाहतूकदार.
२७. कोणत्याही जीवनावश्यक वस्तूंचे कच्चे माल किंवा वेष्टनसामुग्री बनवणारे कारखाने.
२८. आगामी पावसाळ्यासाठी वैयक्तिक वा संस्थात्मक उत्पादनांमधे कार्यरत कारखाने.
२९. **वसई विरार शहर महानगरपालिकेने जाहिर केलेल्या सेवा.**

वर उल्लेखलेल्या सेवां संदर्भात **वसई विरार शहर** महानगरपालिकेतर्फे खालील सर्वसाधारण तत्वांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

१. सर्व सहाय्यक आयुक्त (प्रभाग समिती) कार्यालयांनी हे सर्व निर्बंध नागरिकांच्या वावरावर (Movement of People) असून, वस्तू आणि मालावर नसतील याची नोंद घ्यावी.
२. यात नमूद केलेल्या सेवांच्या कार्यान्वयनासाठी आवश्यक वाहतूक हे वैध कारण राहील, याची नोंद घ्यावी.
३. अत्यावश्यक सेवांसाठी अत्यावश्यक असलेल्या इतर बाबी या अत्यावश्यक सेवा असतील (Principle is, essential for essential is essential). अत्यावश्यक सेवांच्या कार्यान्वयासाठी काही सेवांची विशिष्ट वेळी वा कारणाने गरज भासली तर संबंधित व्यक्ती वा **वसई विरार शहर महानगरपालिके**साठी ती सेवा जीवनावश्यक गणली जावी.

**३. या आदेशात जीवनावश्यक सेवांखालची दुकाने म्हणून गणली गेलेली दुकाने खालील मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणे असतील :**

a. अत्यावश्यक सेवेतील दुकाने हे सामाजिक अंतर ठेवून, सुरु राहण्यास परवानगी असेल. एखाद्या दुकानात गर्दी झाल्यास, चिन्हांकीत ठिकाणी पुरेसे सामाजिक अंतर ठेवून प्रतिक्षा रांगेत संबंधीतास उभे करण्यात यावे.
b. अत्यावश्यक सेवांच्या दुकानांचे मालक व काम करणा-या सर्व व्यक्तींने भारत सरकारच्या निकषानुसार लवकरात लवकर लसीकरण करुन घ्यावे. ग्राहकांशी संपर्क साधण्यासाठी अत्यावश्यक सेवेमधील सर्व दुकांनाना पारदर्शक काचेच्या व इतर कवच याचा उपयोग करण्यात यावा. तसेच ई- पेमेंटला प्रोत्साहन देण्यात यावे.
c. या नियमांचा भंग करणाऱ्या दुकानमालक, कर्मचारी किंवा ग्राहकाला ५०० रुपये दंड केला जाईल. तसेच कोविड सुसंगत वागणूकीचा भंग करणाऱ्या ग्राहकाला माल दिला जात असेल तर दुकानाला १००० रुपये दंड केला जाईल. तसेच कोविडविषयक संकटाची अधिसूचना संपेपर्यंत दुकान बंद करण्याची कारवाईही केली जाऊ शकेल.
d. **जीवनावश्यक वस्तू, दुकानातले व्यवहार करण्यासाठी कर्तव्यपूर्तीसाठी कामगारांची वाहतूक हे वैध कारण धरले जाईल.**
e. दुकान, भाजीपाला दुकान, फळविक्रेते, दूधदुकाने, बेकऱ्या, खाद्यपदार्थ दुकाने या सर्वांच्या संदर्भात दाट लोकवस्तीच्या ठिकाणी दुकाने आहेत का किंवा दुकानांमधे गर्दी होते आहे का, याबद्दल सर्व **सहाय्यक आयुक्त (प्रभाग समिती)** यांनी वेळोवेळी अभ्यास करून दुकानांच्या

वेळा बदलणे तसेच दुकानांच्या वेळा निर्धारित करून देणे आवश्यक आहे. खुल्या मैदानांच्या जागा, मोकळ्या जागा निर्धारित करून काही दुकाने हलवणे शक्य आहे का, तात्पुरत्या स्वरूपाची दुकानं सुरू करता येतील का, हे बघणेही आवश्यक आहे. सर्व **सहाय्यक आयुक्त (प्रभाग समिती)** यांनी सर्व प्रकारचे उपाय योजणे गरजेचे आहे, ज्याद्वारे हे जीवनावश्यक वस्तूंची दुकाने कोविड पसरण्याला कारणीभूत ठरत असतील तर **सहाय्यक आयुक्त (प्रभाग समिती) हे काही दुकाने बंदही करू शकतात.**

f. जे दुकाने सद्यस्थितीत बंद राहणार आहेत, त्या दुकानदार मालकांनी भारत सरकारच्या निकषानुसार सर्व कामगारांचे लसीकरण करुन घ्यावे तसेच आपली दुकाने पारदर्शक काचेच्या व इतर कवच, ई- पेमेंट यानुसार संबंधीतांनी सुसज्ज करुन ठेवावे, जेणे करुन सदर दुकाने उघडण्याची परवानगी देण्याचा निर्णय प्रशासनाला घेता येईल.

## ४. सार्वजनिक वाहतुक :

सार्वजनिक वाहतुक हे खालील प्रतिबंधासह पुर्णपणे चालू राहतील.

| | |
|---|---|
| ऑटो रिक्षा | वाहनचालक + दोन प्रवासी. |
| टॅक्सी (चार चाकी) | वाहनचालक + वाहन क्षमतेच्या ५०% प्रवासी. |
| बस | आर.टी. ओ. मान्यतेनुसार बसण्याच्या क्षमते इतकेच प्रवासी (उभे राहून प्रवास करण्यास बंदी असेल.) |

a. सार्वजनिक वाहतुकीने प्रवास करणा-या सर्व प्रवाशांनी मास्क परिधान करणे बंधनकारक राहील. कोणतेही प्रवासी मास्क व्यतिरक्त आढळल्यास, रक्कम रुपये ५००/- दंड आकरण्यात यावा.
b. चार चाकी टॅक्सीमध्ये कोणतेही प्रवासी / वाहनचालक मास्क व्यतिरक्त आढळल्यास, रक्कम रुपये ५००/- दंड आकारण्यात यावा.
c. प्रत्येक फेरीनंतर वाहने सॅनिटाईज करण्यात यावे.
d. सर्व सार्वजनिक वाहनांचे वाहनचालक व इतर कर्मचारी यांनी भारत सरकारच्या निकषानुसार लवकरात लवकर लसीकरण करुन घ्यावे. तथापी टॅक्सी व ऑटो रिक्षाचालक यांनी स्वत: ला, प्लास्टिक शिट अथवा इतर कवच याद्वारे, प्रवाशांपासून विलगीकरण करण्यात यावे.
e. सार्वजनिक वाहतुकीसाठी जाणाऱ्या कर्मचार्यांचा प्रवास हे वैध कारण असेल.
f. बाहेर जाणा-या रेल्वेमध्ये कोणीही उभ्याने प्रवास करणार नाही याची खात्री रेल्वे प्रशासनाने घ्यावी. तसेच सर्व प्रवासी हे मास्क घातले असतील याची खातरजमा करावी.
g. रेल्वेमध्ये कोणाताही प्रवासी मास्क व्यतिरक्त आढळल्यास, रक्कम रुपये ५००/- दंड आकरण्यात यावा.
h. सार्वजनिक वाहतुकीला परवानगी देतानाच ती सुरळीतपणे व्हावी, यासाठी लागणाऱ्या नैमित्तिक सेवाही त्यात समाविष्ट करूनच ही परवानगी देण्यात येत आहे. त्यात हवाईसेवेसाठी विमानतळावर दिल्या जाणाऱ्या कार्गोसारख्या सेवा तसेच तिकीटविषयक सेवांचाही समावेश आहे.
i. सार्वजनिक वाहतुकीने म्हणजे बस, ट्रेन किंवा विमानाने आलेल्या प्रवाशांना येताना किंवा जाताना घरी जाण्यासाठी किंवा घरून येण्यासाठी करावा लागणारा प्रवास (वैध प्रवास तिकीट दाखवून) करता येईल.

## ५. अपवादात्मक सेवा :

### a. कार्यालये

- खालील कार्यालये हे अपवादात्मक सेवेमध्ये असतील.
    I. केंद्रीय, राज्य तथा स्थानिक शासकीय कार्यालये, त्यांचे प्राधिकरण आणि संघटना
    II. सहकारी, सार्वजनिक युनिट आणि खाजगी बँक

III. अत्यावश्यक सेवा पुरविणाऱ्या कंपन्यांचे कार्यालये
IV. विमा / मेडिक्लेम कंपन्या
V. उत्पादन /वितरण व्यवस्थेमध्ये असणारे औषधी कंपन्यांचे कार्यालय
VI. RBI ने नियत्रित केलेले घटक व मध्येस्था, स्वतंत्र प्राथमिक विक्रेते. CCIL, NPCL. RBI ने नियमित केलेल्या बाजारामध्ये सहभागी होणारे पेमेंट सिस्टम ऑपरेटर व वित्तीय बाजाराचे सहभागी.
VII. सर्व नॉन-बँकिंग वित्तीय महामंडळ
VIII. सर्व मायक्रो फायनान्स संस्था
IX. सुनावणी चालू असेलेल्या वकिलांचे कार्यालये, ट्रिब्युनलस किंवा चौकशी आयोग

- वरील नमुद कर्यालयांनी कमीत कमी कर्मचाऱ्यांसोबत काम करावे आणि एका वेळेला कार्यालयात क्षमतेच्या ५०टक्क्यापेक्षा जास्त कर्मचारी कोणत्याही स्थितीत हजर राहता कामा नये. फक्त कोविड-१९ च्या कामासाठी असणारे शासकीय कार्यालये अपवाद असतील.
- **सदर कार्यालयांमध्ये हजर राहण्यासाठी येण्या-जाण्यासाठी परवानगी गृहीत धरण्यात येईल.**
- शासकीय कार्यालयातील सर्व सभा / बैठक, कार्यालयातील कर्मचा-यांशिवाय इतर कोणाशीही, ऑनलाईन पध्दतीने घेण्यात याव्यात.
- भारत सरकारच्या निकषानुसार सर्व खाजगी व शासकीय कर्मचा-यांनी लवकरात - लवकर लसीकरण करुन घेण्यात यावी. जेणेकरुन शासन उर्वरित कार्यालये कोव्हीड-१९ च्या प्रादुर्भाव किवा गतीची भिती न बाळगता पुन्हा सुरु करण्यात येतील.

**b. खाजगी वाहतूक**

- खाजगी वाहतूक खाजगी बसेस सह सर्व खाजगी वाहने फक्त आपत्कालीन स्थितीत, अत्यावश्यक सेवेसाठी, किंवा या आदेशात नमूद केलेल्या कारणासाठी वाहतूक करू शकतात.
- विनाकारण वाहतूक केल्यास १००० रुपयाचा दंड आकारण्यात येईल.
- खाजगी बस करीता खालील अतिरिक्त नियम लागू असतील.
  I. आसन क्षमतेसह प्रवास करणेस परवानगी असले. कोणत्याही प्रवाशांना उभे राहून प्रवास करण्यास प्रतिबंध असेल.
  II. सर्व कर्मचारी यांनी भारत सरकारच्या निकषानुसार लवकरात लवकर लसीकरण करावेत व कोविड-१९ नियमांचे काटेकोरपणे पालन करावे लागेल.

**c. रेस्टॉरंट्स, बार, हॉटेल्स**

a. कॅम्पसमधील व हॉटेलमधील अविभाज्य भाग वगळता सर्व रेस्टॉरंट्स, बार IN-DINING साठी बंद राहतील.
**b.** फक्त होम डिलीव्हरी साठी परवानगी असेल, आणि कोणीही रेस्टॉरंटस किंवा बार ला ऑडर किंवा डिलीव्हरी घेणेसाठी येणार नाही.
**c.** हॉटेल्समधील रेस्टॉरंट्स व बार हे फक्त हॉटेलमधील पाहुण्यांसाठी खुले ठेवण्यास परवानगी असेल. कोणत्याही परिस्थितीत बाहेरील व्यक्तींस परवानगी दिली जाउ नये. हॉटेलमधील पाहुणे फक्त वैध कारणांसाठी बाहेर जाऊ शकतील. आपली ड्युटी करणे किंवा अत्यावश्यक सेवा पुरवण्याचे काम असेल तरच त्यांना बाहेर जाता येईल.
**d.** होम डिलीव्हरी करणारे सर्व कर्मचा-यांचे भारत सरकारच्या निकषानुसार लवकरात लवकर लसीकरण करावेत.

e. ज्या इमारतींमध्ये एकापेक्षा जास्त कुटुंब राहात असतील तिथे होम डिलिव्हरी करण्यासाठी सर्व निर्बंधाचे पालन करावे लागतील आणि हे पार्सल त्या इमारतीचे कर्मचारी आत मध्ये पोहोचू शकतील. होम डिलिव्हरी करणारे कर्मचारी आणि बिल्डिंग चे कर्मचारी यांच्यातील संवाद हा कोविड नियमांचा पालन करून व्हावा.

f. कोविडचे नियम तोडल्यास अथवा त्याचे उल्लंघन केल्यास व्यक्तिश: १००० रुपये दंड आकारला जाईल, तसेच आस्थापनेच्या विरोधात १०,००० रुपये दंड आकारला जाईल. वारंवार अशाच प्रमाणे उल्लंघन केल्याचे आढळल्यास कोविड-१९ निर्बंध लागू असेपर्यंत परवाना रद्द करण्यात येईल.

g. रेस्टॉरंटमध्ये काम करणा-या सर्व कर्मचा-यांचे भारत सरकारच्या निकषानुसार लवकरात लवकर लसीकरण करावेत

**d. उत्पादन क्षेत्र**

a. खालील कारखाने वेगवेगळ्या शिफ्टमध्ये चालू राहू शकतात.

   i. आवश्यक सेवेसाठी लागणारा माल तयार करणारे कारखाने आपल्या पूर्ण क्षमतेअनुसार चालू राहतील.

   ii. निर्यात करण्यासाठीचे सामान बनविणारे कारखाने ज्यांना माल बाहेर पाठवायचा आहे.

   iii. ज्या कारखान्यांमध्ये एकदम काम थांबवता येणार नाही आणि जास्त वेळ लावल्याशिवाय उत्पादन पुन्हा सुरू होऊ शकणार नाही अशा सर्व कारखान्यांना ५० टक्के क्षमते सह काम करता येईल. महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागाने यावर नजर ठेवावी व सर्व नियम काटेकोरपणे पाळले जात आहे याची खात्री करावी. अत्यावश्यक सेवेसाठी लागणा-या उत्पादना व्यकतीरिक्त ऑक्सीजनचा वापर कोणत्याही उत्पादन क्षेत्रास करता येणार नाही.

b. कामगारांना राहण्याची व्यवस्था असणारे सर्व उद्योग किंवा युनिट मध्ये कामगार त्याच परिसरातील किंवा इतर ठिकाणच्या कारखान्यात काम करत असतील आणि तेथून वाहतूक सोयीस्कर आणि सुरक्षित असेल तर ये जा करता येईल. त्याचप्रमाणे व्यवस्थापन मधील १० टक्के कर्मचारी अधिकाऱ्यांना बाहेरून येऊन काम करता येईल. ज्या स्टाफ मधील कर्मचाऱ्यांना बाहेर जाण्याची गरज नाही, असे कारखाने वेगवेगळ्या शिफ्टमध्ये काम करू शकतात.

c. व्यवस्थापन, कर्मचारी, प्रशासना मधील स्टाफच्या सगळे कर्मचारी व अधिकाऱ्यांना शक्य तेवढ्या लवकर लसीकरण करून घ्यावे लागतील. जर हे कारखाने भारत सरकारच्या कार्यस्थळ लसीकरण अटीत बसत असतील, तर त्यांना लसीकरणाची व्यवस्था करावी लागेल.

d. कारखाने आणि उत्पादन करणारे युनिट यांना खालील नियमांचे पालन करावे लागेल.

   i. उत्पादन क्षेत्र व कारखाने यांनी सर्व कामगारांचे शरीराचे तापमान प्रवेशव्दारावरच दररोज तपासणी करणे आणि सर्वांचे कोव्हीड सुसंगत वर्तन आहे का हे तपासणे

   ii. एखादा कामगार / कर्मचारी कोरोना पॉझिटिव्ह आढळल्यास, त्याच्या संपर्कात आलेल्या सर्व कर्मचा-यांना वेतनासह क्वॉरंटाईन करण्यात यावे.

   iii. ५०० पेक्षा जास्त कर्मचारी असलेलया सर्व उत्पादन क्षेत्र व कारखाने यांनी स्वत:चे क्वॉरंटाईन सेंटर बनविण्यात यावे.

   iv. एखादा कर्मचारी कोरोना पॉझिटिव्ह आढळल्यास, तो क्षेत्र पुर्णपणे सॅनिटाईज होईपर्यंत बंद ठेवण्यात यावे.

v. गर्दी टाळण्यासाठी दुपारचे जेवण व चहा ब्रेक टप्याटप्याने जाहीर करण्यात यावा.
vi. सामान्य शौचालय वारंवार सॅनिटाईज करण्यात यावे.

- एखादा कर्मचारी कोरोना पॉझिटिव्ह आढळल्यास, त्यास वैद्यकीय रजेवर जाण्याची परवानगी देण्यात यावी तसेच या कारणास्तव त्यांना कामावरुन काढण्यात येऊ नये. सदर कर्मचा-यास रजेच्या कालावधीचा संपुर्ण पगार देण्यात यावा.

- या ठिकाणी नमूद नाही केलेले सगळे उद्योग/कारखाने यांनी आपला उद्योग सदर आदेशामध्ये उल्लेखित कालावधीपर्यंत बंद ठेवावा.

**e. रस्त्यावरील खाद्य पदार्थ विक्रेतेसाठी**

- कोणत्याही प्रकारच्या खाद्य पदार्थ त्या स्थळी खाण्यास परवानगी नसेल. पार्सल व होम डिलीव्हरीसाठी दररोज सकाळी ७ ते रात्री ८ पर्यंत परवानगी असेल.
- पार्सल घेण्यासाठी आलेल्या व प्रतिक्षेत असलेल्या ग्राहकांनी पुरेस सामाजिक अंतर ठेऊन काऊंटर पासून दूर उभे रहावे.
- भारत सरकारच्या निकषानुसार सर्व खाद्यपदार्थ विक्रेतानी लवकरात लवकर लसीकरण करावेत
- **सर्व सहाय्यक आयुक्तांना** सुचित करण्यात येते आहे की, कोणतेही खाद्य पदार्थ विक्रेते किंवा ग्राहकांनी नियमांचे उल्लघंन केल्यास, त्यांचेकडुन ५०० रूपये दंड आकारण्यात यावा.
- या नियमांचे वारंवार उल्लंघन केल्यास, त्या खाद्य पदार्थ विक्रेत्यांवर तात्पुरत्या स्वरुपात किंवा कोव्हीड-१९ संपेपर्यंत बंदी घालण्यात येईल.

**f. वर्तमानपत्र / मॅगझिन्स / नियतकालिके**

- वर्तमानपत्र / मॅगझिन्स / नियतकालिकांची छपाई तसेच प्रसिध्दी केले जाऊ शकते.
- फक्त होम डिलीव्हरी करण्यास परवानगी असेल.
- होम डिलीव्हरी करणा-या कर्मचा-यांनी भारत सरकारच्या निकषानुसार लवकरात लवकर लसीकरण करावेत

**६. मनोरंजन, करमणूक, शॉपिंग मॉल्स, शॉपिंग सेंटर्स :**

a. सर्व सिनेमागृह बंद राहतील.
b. सर्व नाटयगृह व सभागृह बंद राहतील.
c. सर्व करमणूक पार्क / आर्केड / व्हिडीओ गेम पार्लर बंद राहतील.
d. सर्व वॉटर पार्क बंद राहतील.
e. सर्व क्लब, जलतरण तलाव, जिम व क्रिडा संकुल बंद राहतील.
f. भारत सरकारच्या निकषानुसार या सर्व आस्थापनाशी संबंधित व्यक्तिनी लवकरात - लवकर लसीकरण करुन घेणे, जेणे करुन कोव्हीड-१९ च्या प्रादुर्भाव किवा गतीची भिती न बाळगता ही सर्व आस्थापने पुन्हा सुरु करता येतील.
g. चित्रपट / मालिका / जाहिरातीचे शुटिंग बंद राहतील.
h. अत्यावश्यक सेवा वगळता सर्व दुकाने, शॉपिंग सेंटर्स, व शॉपिंग मॉल्स हे बंद राहतील.
i. **सर्व चौपाटया, बागा, सार्वजनिक मैदाने बंद राहतील.** सदर सार्वजनिक जागा जर नमूद प्रयोजनार्थ वापरण्यात येत असतील तर सदर आदेशाच्या कार्यवाहीच्या कालावधीत त्यांचा वापर करण्याबाबत निर्णय सर्व **सहाय्यक आयुक्त (प्रभाग समिती)** यांचेकडे असेल.

**७. धार्मिक पूजास्थाने व स्थळे :**

a. सर्व धार्मिक प्रार्थनास्थळे बंद राहतील.
b. सर्व धार्मिक स्थळांवर काम करणारे कर्मचारी, पुजारी, यांना दैनंदिन पुजा करता येईल. बाहेरील कोणत्याही व्यक्तीस आत येण्यास परवागनी नसेल.
c. भारत सरकारच्या निकषानुसार धार्मिक स्थळांवर काम करणारे कर्मचारी, पुजारी यांचे तातडीने लसीकरण करण्यात यावे, जेणे करुन सर्व धार्मिक स्थळे पुन्हा सुरु करण्यात येईल.

**८. सलून / स्पा / ब्युटि पार्लर :**

a. सर्व सलून / स्पा / ब्युटि पार्लर बंद राहतील.
b. भारत सरकारच्या निकषानुसार सलून / स्पा / ब्युटि पार्लर या ठिकाणी काम करणा-या सर्व कर्मचा-यांचे तातडीने लसीकरण करण्यात यावे, जेणे करुन सर्व सलून / स्पा / ब्युटि पार्लर पुन्हा सुरु करण्यात येईल.

**९. शाळा व महाविद्यालय :**

a. सर्व शाळा व महाविद्यालये बंद राहतील.
b. हा नियम १० वी व १२ वीच्या परिक्षेसाठी शिथिल राहील. परिक्षेसाठी वापरले जाणारे सर्व कर्मचारी / शिक्षक यांनी लसीकरण करुन घेण्यात यावी किंवा कोव्हीड-१९ **निगेटिव्ह RTPCR / RAT / TruNAT / CBNAAT प्रमाणपत्र** (४८ तासांपर्यंत वैध) सोबत ठेवणे बंधनकारक राहील.
c. राज्या बाहेरील कोणत्याही विद्यापीठ, मंडळ, किंवा प्राधिकरणाकडुन घेतल्या जाणा-या परिक्षांसाठी महाराष्ट्रात राहणा-या विद्यार्थ्यांसाठी परवानगी देण्यात यावी.
d. ज्या विद्यार्थ्यांना परीक्षा देण्यासाठी प्रत्यक्ष उपस्थित राहणे आवश्यक आहे, त्यांना वैध परीक्षा प्रवेशपत्राच्या आधारे एका व्यक्ती सोबत प्रवास करण्याची परवानगी देण्यात यावी.
e. सर्व खाजगी कोचिंग क्लासेस बंद राहतील.
f. भारत सरकारच्या निकषानुसार शाळा / महाविद्यालयातील काम करणारे सर्व कर्मचारी, शिक्षक यांनी तातडीने लसीकरण करण्यात यावे. जेणे करुन सर्व शाळा / महाविद्यालय पुन्हा सुरु करण्यात येईल.

**१०. धार्मिक, सामाजिक, राजकिय, सांस्कृतीक कार्यक्रम :**

a) कोणत्याही धार्मिक, सामाजिक, राजकिय, सांस्कृतीक कार्यक्रमांस परवानगी नसेल.
b) लग्न समारंभासाठी जास्तीत जास्त २५ व्यक्तिस परवानगी देण्यात येत आहे.
    a) लग्न समारंभाचा हॉल किंवा इतर कोणत्याही ठिकाणी लग्न असल्यास, तेथे काम करणा-या कर्मचा-यांनी लसीकरण करुन घेण्यात यावे. जो पर्यंत लसीकरण होत नाही तो पर्यंत **निगेटिव्ह RTPCR / RAT / TruNAT / CBNAAT प्रमाणपत्र** सोबत बाळगावे.
    b) कोणताही कर्मचारी कोव्हीड-१९ निगेटिव्ह RTPCR / RAT / TruNAT / CBNAAT प्रमाणपत्र / लसिकरण केल्याशिवाय काम करत असल्याचे आढळल्यास, त्याच्याकडून रक्कम रू. १०००/- दंड आणि संबंधीत आस्थापनेकडून रक्कम रू. १०,०००/- दंड वसूल करण्यात यावा.
    c) या नियमाचे वारंवार उल्लंघन करणा-या आस्थापना सिल करण्यात येतील तसेच त्यांचे परवाने कोव्हीड-१९ ची सूचना असेपर्यंत रद्द करण्यात येतील.
    d) एखादा विवाह समारंभ धार्मिक प्रार्थनास्थळी आयोजित केल्यास उपरोक्त नियमांच्या अधीन राहून त्यासाठी परवानगी देण्यात येईल.

c) अंत यात्रेसाठी २० व्यक्तिस परवानगी असेल. सर्व संबंधीत कर्मचा-यांनी लवकरात -लवकर लसीकरण करुन घेण्यात यावे किंवा निगेटिव्ह RTPCR / RAT / TruNAT / CBNAAT प्रमाणपत्र सोबत बाळगावे.

**११. ऑक्सिजन उत्पादक :**

**A.** कोणत्याही औद्योगिक प्रकिया ज्यामध्ये कच्चा माल म्हणून ऑक्सिजनचा वापर केला जातो अशा प्रक्रियेस परवानगी नसेल. परंतु अत्यावश्यक उपक्रमातील प्रक्रियेसाठी किंवा अपवादात्मक परिस्थितीत आवश्यक कारणांची नोंद करून परवाना विभाग सदर प्रक्रियेस परवानगी देऊ शकतील.

**B.** सर्व ऑक्सिजन उत्पादकांनी ( क्षमतेच्या तसेच प्रत्यक्ष ) टक्केवारीचा हिस्सा वैद्यकीय किंवा औषधी उद्देशासाठी राखून ठेवण्यात यावे. सर्व उत्पादकांनी आपल्या ग्राहकांना १० एप्रिल,२०२१ नंतर ऑक्सिजनचा वापर टाळण्यासाठी सांगण्यात यावे.

१२. **ई- कॉमर्स :**

a. ई-कॉमर्स ना फक्त मुदा क्र. २ मध्ये नमूद अत्यावश्यक वस्तू आणि सेवा यांचे वितरण करण्याची परवानगी आहे.

b. घरपोच वितरण/ सेवा देण्याच्या कृतीशी संबंधित असलेली प्रत्येक व्यक्ती किंवा अशा व्यक्तींच्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने भारत सरकारच्या निकषानुसार तात्काळ लस घ्यावी आणि जर संबंधित संस्था कामाच्या ठिकाणी लसीकरण करण्याविषयीच्या भारत सरकारच्या निकषांमध्ये येत असेल तर त्या संस्थेने लसीकरण शिबीर आयोजित करणे अनिवार्य आहे. घरपोच सेवा देत नाहीत किंवा अशा सेवा देणाऱ्या कर्मचार्यांच्या संपर्कात येत नाहीत अशा कर्मचाऱ्यांनी, संस्थांशी संबंधित नियम ५ चे अनुकरण करावे.

c. ज्या इमारतींमध्ये एकापेक्षा जास्त कुटुंब राहात असतील तिथे होम डिलिव्हरी करण्यासाठी सर्व निर्बंधाचे पालन करावे लागतील आणि हे पार्सल त्या इमारतीचे कर्मचारी आत मध्ये पोहोचू शकतील. होम डिलिव्हरी करणारे कर्मचारी आणि बिल्डिंग चे कर्मचारी यांच्यातील संवाद हा कोविड नियमांचा पालन करून व्हावा.

d. कोविड संबंधित कुठल्याही नियमाचा उल्लंघन झाल्यास रु. १०००/- इतका दंड आकारण्यात येईल. तसेच वारंवार नियमांचे उल्लंघन करणा-यांवर त्यांचा परवाना कोव्हीड-१९ संपेपर्यंत रद्द केला जाऊ शकतो.

**१३. सहकारी गृह निर्माण संस्था :**

a. कोणतीही सहकारी गृह निर्माण संस्था ज्यामध्ये ५ पेक्षा अधिक संक्रिय कोरोना पॉझिटिव्ह केस असतील त्या सर्व सहकारी गृह निर्माण संस्था सूक्ष्म कंटेनमेंट झोन मानली जातील.

b. अशा सर्व गृह निर्माण संस्थानी आपल्या सोसायटी बाहेर माहिती बोर्ड लावून अभ्यंगतास प्रवेश नाकारावा.

c. सुक्ष्म कंटेनमेंट झोनमध्ये आत येणारे व बाहरे जाणारे व्यक्ति, यावर संबंधित गृह निर्माण संस्थेने निर्बध ठेवावे.

d. कोणत्याही नियमाचे उल्लंघन झाल्यास, सदर गृह निर्माण संस्थेस रुपये १०,०००/- दंड आकारला जाईल. तसेच याची पुर्नरावृती झाल्यास, जास्त दंड आकारला जाऊ शकतो.

e. सर्व गृह निर्माण संस्थांना सुचित करण्यात येत आहे की, सोसायटीमध्ये दररोज येणा-या व्यक्तिंची लसीकरण होई पर्यंत RTPCR / RAT / TruNAT / CBNAAT चाचणी करण्यात यावी.

१४. **बांधकाम विषयक कामकाज :**

a. ज्या साईटवर कामगार राहत आहेत फक्त अशा बांधकाम साईटना परवानगी देण्यात येत आहे. मटेरियलची ने-आण वगळता बाहेरील सर्व हालचाल टाळण्यात यावेत.

b. बांधकाम साईट वर काम करणा-या सर्व कामगार / कर्मचा-यांनी भारत सरकारच्या निकषानुसार लवकरात लवकर लसीकरण करावेत.

c. कोणत्याही नियमाचे उल्लंघन झाल्यास, सदर बांधकामा विकासकास रुपये १०,०००/- दंड आकारला जाईल. तसेच याची पुर्नरावृती झाल्यास, संबंधीत बांधकाम साईट कोव्हीड-१९ संपेपर्यंत बंद केली जाऊ शकते.

d. एखादा कामगार / कर्मचारी कोरोना पॉझिटिव्ह आढळल्यास, त्यास वैद्यकीय रजेवर जाण्याची परवानगी देण्यात यावी तसेच या कारणास्तव त्यांना कामावरुन काढण्यात येऊ नये. सदर कर्मचा-यास रजेच्या कालावधीचा संपुर्ण पगार देण्यात यावा.

e. बांधकामाच्या किंवा जनतेच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून पावसाळापूर्व खबरदारी म्हणून **वसई विरार शहर** महानगरपालिका एखाद्या बाधकाम कामास परवानगी देण्याबाबत निर्णय घेऊ शकते.

१५. **दंडनिय कारवाई :-**

जमा झालेला सर्व दंड वसई विरार शहर महानगरपालिकेतर्फे कोविड-१९ Disaster च्या आपत्तीच्या नियंत्रणासाठी आणि उपचारासाठी उपयोगात आणला जाईल.

**सदर आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.**

उक्त आदेशांचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आल्यास सर्व संबधितांवर साथरोग अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम ५१ ते ६० अन्वये तसेच, भारतीय दंड संहिता, यामधील कलम १८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात येईल, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

**सदरचा आदेश कोविड-१९ चा प्रार्दभाव रोखण्याच्या दृष्टीने दिनांक १ मे, २०२१ सकाळी ७ वाजेपर्यंत पर्यंत लागू असेल. हा आदेश वसई विरार शहर महानगरपालिकेने Break The Chain अंर्तगत जारी केलेल्या आदेशाचा पुरवणी आदेश म्हणून जाहिर करण्यात येत आहे.**

उपरोक्त आदेश सुलभ संदर्भासाठी शासनाचे वरील संदर्भ क्र.७ च्या आदेशानुसार निर्गमित करण्यात येत आहेत. तथापि, अर्थबोध होतांना काही बाबींची स्पष्टता न झाल्यास किंवा विसंगती असल्यास शासनाची संदर्भ क्र.७ची मुळ आदेश वाचावेत. त्या आदेशातील निर्देश जेसेच्या-तसे **वसई विरार शहर महानगरपालिका** क्षेत्रात लागू राहतील.

१५/५

**मा. आयुक्त यांचे मान्यतेने**

**(संतोष देहेरकर)**
**अतिरिक्त आयुक्त**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

**<u>प्रत</u> :-**

१. मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव.

२. मा.पालकमंत्री पालघर महोदयांचे खाजगी सचिव.

३. मा.मुख्य सचिव महोदयांचे विशेष कार्य अधिकारी.

१. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग.

२. मा. पोलिस आयुक्त, मिरा भाईंदर- वसई विरार आयुक्तालय.

३. मा. जिल्हाधिकारी, पालघर.

४. स्विय सहायक, मा. आयुक्त व अतिरिक्त आयुक्त ( दक्षिण व उत्तर) यांचे कार्यालयाकडे माहितीसाठी

५. पोलिस उप आयुक्त, वसई.

६. उप आयुक्त (सर्व) व उपआयुक्त, परिमंडळ १, २,३ यांजकडे आवश्यक कार्यवाहीसाठी

७. सहाय्यक आयुक्त (सर्व) / विभाग प्रमुख (सर्व) / खाते प्रमुख (सर्व) यांजकडे आवश्यक कार्यवाहीसाठी.

८. आय.टी. विभाग यांजकडे महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी